RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष २, अंक १] शुक्रवार, जानेवारी १, २०१६/पौष ११, शके १९३७ [पृष्ठे ३ किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक १

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० डिसेंबर २०१५

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.**

क्रमांक मूवक. १५१५/प्र. क्र. १५८/कराधान-१.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री झाली आहे की, मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये तात्काळ सुधारणा करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि त्यामुळे महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) च्या कलम ८३ च्या पोट-कलम (४) च्या परंतुकानुसार सदर नियमांना पूर्व प्रसिद्धी देण्याची अट पाळण्याची गरज नाही.

म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ८३ च्या उप-कलम (४) च्या परंतुकासह, उप-कलमे (१) आणि (२) च्या शक्तींचा वापर करून तसेच यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

**१.** (१) या नियमांना महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (तिसरी सुधारणा) नियम, २०१५ असे संबोधण्यात येईल.

(२) या नियमांमध्ये अन्यथा उपबंधित केल्याव्यतिरिक्त, हे नियम दिनांक १ जानेवारी २०१६ पासून अंमलात आले असे समजण्यात यावे.

**२.** महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ च्या नियम ५२ क नंतर खालील नियम समाविष्ट करण्यात येत आहे, म्हणजेच "नियम ५२ ख अधिनियमातील अनुसूची "घ" मध्ये अंतर्भूत असलेल्या विशिष्ट मालावरील वजावट :—

नियम ५२, ५३ आणि नियम ५४ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी,—

(१) जर मागणीदार व्यापा-याने अधिनियमास जोडण्यात आलेल्या अनुसूची "घ" मधील नोंदी १३ आणि १४ मध्ये अंतर्भूत असलेल्या मालाची खरेदी केलेली असेल, तर असा व्यापारी उक्त मालाच्या बाबतीत पुढील रकमेच्या एकूण रकमेइतकी वजावट मागण्यास पात्र असेल,—

(क) केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ अन्वये तत्सम मालाच्या आंतरराज्य फेरविक्रीवरील देय अथवा भरणा केलेला कर ; आणि

(ख) जर या अधिनियम अंतर्गत स्थानिक पुर्नविक्री असेल, तर उक्त मालाच्या खरेदीवर भरणा केलेला कर.

(२) अशा व्यापा-याने अशा मालाची तत्सम विक्री ज्या महिन्यात केली असेल त्या महिन्यातच वरील उपनियम (१) अन्वये उक्त मालाबाबत निश्चित केलेल्या वजावटीचा दावा करेल :

परंतु, असा माल हा जर निर्यातीच्या ओघात भारतीय संघराज्याच्या बाहेर विकण्यात आला असेल तर अशा मालाच्या खरेदीस या नियमातील कोणतीही तरतूद लागू होणार नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रा. द. भगत,
शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 30th December 2015

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

No. VAT. 1515/CR-158/Taxation-1.—Whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action further to amend the Maharashtra Value Added Tax Rules, 2005 and to dispense with the condition of previous publication thereof under the proviso to sub-section (*4*) of section 83 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah. IX of 2005).

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) read with the proviso to sub-section (*4*) of section 83 of the said Act, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra and hereby, makes the following rules further to amend the Maharashtra Value Added Tax Rules, 2005, namely :—

**1.** (*1*) These rules may be called the Maharashtra Value Added Tax (Third Amendment) Rules, 2015.—

(*2*) They shall come into force on 1st January 2016.

**2.** In the Maharashtra Value Added Tax Rules, 2005, after rule 52A, the following rule shall be added namely :—

" **52B. Set-off in respect of certain goods covered under Schedule D of the Act** :—

Notwithstanding anything contained in rules 52, 53 and 54,—

(*1*) If the claimant dealer has purchased goods covered under entries 13 and 14 of schedule ' D ' appended to the Act, then he shall be entitled to claim set-off in respect of the said goods only to the extent of aggregate of,—

(*a*) the taxes paid or payable under the Central Sales Tax Act, 1956 on the inter-state resale of the corresponding goods, and

(*b*) the taxes paid on the purchases of said goods, if are resold locally under the Act.

(*2*) The set-off as determined under sub-rule (*1*) above in respect of the said goods shall be claimed only in the month in which corresponding sales of such goods is effected by the claimant dealer :

Provided that, nothing in this rule shall apply to the purchases of such goods which are sold in the course of export of goods out of the territory of India."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. D. BHAGAT,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.